ePaper


## “स्वत:च्या अहंकारामुळे संघटनेला ग्रहण”: सदाभाऊ खोत



वर्ष - 8 । अंक - 19 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


### आतील पानांत


- टीम इंडिया सेमीफायनलमध्ये दाखल
- इंग्लंडमध्ये षटकार मारण्यावर बंदी!
- नीट-यूजी फेरपरीक्षा होणार नाही!
- मंदिराची विटंबनाअधिक


www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 24 जुलै 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## सुप्रियया सुळेंचा केंद्राला सवाल, तर शिंदेसह दादांनाही डिवचलं

# आंध्रप्रदेश, बिहार लाडका महाराष्ट्र परका का?

### अजित पवार गट आणि शिंदे गटावरही टीका




**। पुणे । विशेष प्रतिनिधी। महाईन्यूज**

**अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज म्हणजेच २३ जुलै रोजी मोदी ३.० चा पहिला अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पाकडून सर्वसामान्य आणि उद्योगसमूहाच्या मोठ्या अपेक्षा आहेत. या अर्थसंकल्पात सरकारचे लक्ष महिला आणि तरुणांवर केंद्रित करण्यात आले आहे. त्याचबरोबर मोदी सरकारने बिहार आणि आंध्र प्रदेशच्या विकासावर विशेष लक्ष दिले आहे. मोदी सरकारने टॅक्स स्लॅबमध्ये मोठे बदल केले आहेत. यावर आता अनेक प्रतिक्रिया समोर येत आहे. सुप्रिया सुळे यांनीही यावर प्रतिक्रिया दिली आहे. या त्यांनी केंद्र सरकारला सवाल विचारला आहे.**

केंद्रीय अर्थसंकल्प जाहीर होताच विरोधकांनी सरकारवर टीका करण्यास सुरुवात केली आहे. आता याबाबत सुप्रिया सुळेंनी पत्रकार परिषद घेत केंद्र सरकारवर टीकास्त्र डागलं आहे. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, हे एका विशिष्ट राज्याचं बजेट नसून देशाचं आहे. त्यामुळे सर्व राज्याला समान अधिकार मिळेल अशी आमची अपेक्षा होती. आंध्र प्रदेश आणि बिहारला अधिकार दिल्याचे दु:ख नाही, मात्र महाराष्ट्रावर अन्याय का? आंध्रप्रदेश, बिहार लाडका आणि महाराष्ट्र परका का? असा प्रश्न यावेळी मला सरकारला विचारायचा आहे, असं सुळे म्हणाल्या आहेत.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, आंध्र प्रदेश आणि बिहारला जास्त दिल्याचे दु:ख नाही. पण हे देशाचं बजेट आहे. दो राज्यांचं नाही. स्वत:ची खुर्ची वाचवण्यासाठी आणि सत्ता टिकवण्यासाठी भाजपने असं केलं आहे. याआधीही २०१४ चंद्राबाबूंनी या गोष्टी मागितल्या होत्या. मात्र तेव्हा सरकारने दिल्या नाही. मात्र आता ३०० वरुन २४० वर आले तेव्हा भाजपला लहान राज्ये दिसायला लागली आहेत. जे आता आंध्र प्रदेश आणि बिहारला मिळालं आहे, याचं श्रेय जनतेला जातं. एनडीए सरकारमधील महाराष्ट्रातील खासदारांना मला विचारायचं आहे, मित्रपक्ष असून तुमच्या पदरात काहीच का पडलं नाही.

या केंद्रीय अर्थसंकल्पात टॅक्सबद्दल दिलासा मिळाला नाही. बजेटमधील अनेक गोष्टी या कॉंग्रेसच्या जाहीरनाम्यातील आहेत. काही राज्यातील योजना सरकारने बजेटमध्ये घेतल्या आहेत. त्यांनी काही राज्यांच्या योजना कॉपी केल्या आहेत, असं म्हणत सुप्रिया सुळेंनी केंद्र सरकारला धारेवर धरलं आहे.

### कॉर्पोरेटिव्ह फेडरलचा अपमान

**जमिनी हा राज्याचा विषय आहे. अर्थसंकल्पात जमिनीचे डिजीटलायजेशन करण्याचा मुद्दा घेण्यात आला आहे. मात्र, हा राज्याचा विष्य असून त्यात केंद्र सरकार का हस्तक्षेप करत आहे, असा सवालही त्यांनी केला. असे करणे म्हणजे राज्यांचा आणि कॉर्पोरेटिव्ह फेडरला अपमान आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. अनेक काँग्रेसच्या योजना आणि राज्यांच्या योजना त्यांनी उचलल्या आहेत. बिहार आणि आंध्र प्रदेशला जे काही मिळाले आहे, त्याचे श्रेय जनतेला आहे, असेही सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केले.**

## पुण्यात पुन्हा ड्रिंक अँड ड्राईव्ह, मद्यधुंद अवस्थेत बस दामटवली!

### वाहनांना उडवत नागरिकांना चिरडलं; दोघे गंभीर जखमी

**।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राज्यात अपघातांचं प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढलं आहे. त्यातल्या त्यात पुण्यातील बहुचर्चित कल्याणीनगर पोर्श कार हिट अँड रन अपघाताला जेमतेम महिना झालाय. त्याचदरम्यान, ट्रॅफिक पोलिसाला धडक दिल्याची घटना उघडकीस आली होती. आता पुन्हा एकदा शहरामध्ये एक धक्कादायक घटना उघडकीस आली



आहे. कोथरूडमध्ये एका खाजगी बस चालकाने मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवली आणि वाहनांना चिरडले, या विचित्र आपघातात दोघे गंभीर जखमी झाले आहेत. एका तरुणाच्या गळ्यात दुचाकीचे स्टॅन्ड घुसल्याने तो गंभीररित्या जखमी आहेयामध्ये दोन दुचाकी, एक रिक्षा, खासगी चारचाकी प्रवासी वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. रात्री १० वाजेच्या सुमारास ही घटना घडली असल्याचं समोर आलं आहे. दरम्यान, पावसाळा सुरू झाल्याने अनेक ठिकाणचे रस्ते निसरडे झाल्याचे पाहायला मिळते. या निसरड्या रस्त्यावरून वाहने घसरत आहे. त्यामुळे अनेक नागरिक जखमी होताना पाहायला मिळतात.

### देहू रोड उड्डाणपुलावर धिंगाणा

पिंपरी चिंचवड भागात देहू रोड परिसरातील हा व्हिडिओ असून यामध्ये चारचाकी कारमध्ये बसलेले तरुण दरवाजाच्या खिडकीतून बाहेर येऊन डान्स करताना पाहायला मिळाले. अशी धोकादायक स्टंटबाजी या तरुणांच्या जीवावर भेटू शकते, याचा अंदाज देखील या तरुणांना नाही. मात्र याबाबत पोलिसांनी योग्य ती कारवाई करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

मात्र, आंबेगाव तालुक्यामधून चक्क पीकअप गाडी घसरल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. रस्त्यावर वाहने कमी असल्याने मोठी दुर्घटना टळली. ही गाडी रस्त्याच्याकडेला असलेल्या कांद्याच्या बराखीला धडकली. त्यात त्या बराखीचे मोठे नुकसान झाले.

# पवना धरण 50 टक्के भरले!

## पुढील सहा महिने पुरेल एवढा हा पाणीसाठा आहे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मागील चार दिवसांपासून धरण पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे पिंपरी-चिंचवडकरांची तहान भागविणारे पवना धरण ४९.३० टक्के म्हणजे निम्मे भरले आहे. पुढील सहा महिने पुरेल एवढा हा पाणीसाठा आहे. मात्र, महापालिकेने पाणीपुरवठा दिवसाआडच सुरू राहणार असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे शहरवासीयांना दररोज पाणीपुरवठ्याची आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे.**




पिंपरी-चिंचवडसह मावळ भागातील विविध गावांचा पाण्याचा पवना धरण मुख्य स्रोत आहे. पावसाने ओढ दिल्याने धरणातील पाणीसाठा १७ टक्क्यांवर आला होता. मावळातील आंद्रा, वडिवळे, टाटा या छोट्या धरणांमधील पाणीसाठ्याने तळ गाठायला सुरुवात केली होती. मागील चार दिवसांपासून पावसाने धरण पाणलोट क्षेत्रात दमदार हजेरी लावली. पिंपरी-चिंचवडसह मावळ भागातील विविध गावांचा पाण्याचा पवना धरण मुख्य स्रोत आहे. पावसाने ओढ दिल्याने धरणातील पाणीसाठा १७ टक्क्यांवर आला होता. मावळातील आंद्रा, वडिवळे, टाटा या छोट्या धरणांमधील पाणीसाठ्याने तळ गाठायला सुरुवात केली होती. मागील चार दिवसांपासून पावसाने धरण पाणलोट क्षेत्रात दमदार हजेरी लावली. जोरदार पावसाने धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाली. १ जूनपासून धरण परिसरात १०७७ मिली मीटर पावसाची नोंद झाली. तर, पाणीसाठ्यात ३१.८७ टक्क्यांनी वाढ झाली. धरणातील पाणीसाठा ४९.३० टक्क्यांवर पोहोचला आहे. पुढील सहा महिन्यांचा पाण्याचा प्रश्न मिटला असून, आता शहरवासीयांना दररोज पाणीपुरवठ्याची प्रतीक्षा आहे. समन्यायी पाणीवाटपाचे कारण देत महापालिकेने २५ नोव्हेंबर २०१९ पासून एकदिवसाआड पाणीपुरवठा सुरु केला. काही दिवसांसाठीची पाणीकपात महापालिका प्रशानाने अनिश्चित काळासाठी कायम ठेवली. साडेचार वर्षे झाले, तरी पिंपरी-चिंचवडकरांना दिवसाआडच पाणीपुरवठ्याला सामोरे जावे लागत आहे. दररोज पाणीपुरवठा करण्याची नागरिकांची मागणी आहे. दुसरीकडे एकदिवसाआड पाणीपुरवठा सुरू असल्याने नागरिकांना मुबलक पाणी मिळत आहे. पाण्याच्या तक्रारींच्या संख्येत देखील घट झाल्याचा प्रशासनाचा दावा आहे.जोरदार पावसाने धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाली. १ जूनपासून धरण परिसरात १०७७ मिली मीटर पावसाची नोंद झाली. तर, पाणीसाठ्यात ३१.८७ टक्क्यांनी वाढ झाली. धरणातील पाणीसाठा ४९.३० टक्क्यांवर पोहोचला आहे. पुढील सहा महिन्यांचा पाण्याचा प्रश्न मिटला असून, आता शहरवासीयांना दररोज पाणीपुरवठ्याची प्रतीक्षा आहे. समन्यायी पाणीवाटपाचे कारण देत महापालिकेने २५ नोव्हेंबर २०१९ पासून एकदिवसाआड पाणीपुरवठा सुरु केला. काही दिवसांसाठीची पाणीकपात महापालिका प्रशानाने अनिश्चित काळासाठी कायम ठेवली. साडेचार वर्षे झाले, तरी पिंपरी-चिंचवडकरांना दिवसाआडच पाणीपुरवठ्याला सामोरे जावे लागत आहे. दररोज पाणीपुरवठा करण्याची नागरिकांची मागणी आहे.

### पाणीसाठा 17 टक्क्यांवर आला होता

दुसरीकडे एकदिवसाआड पाणीपुरवठा सुरू असल्याने नागरिकांना मुबलक पाणी मिळत आहे. पाण्याच्या तक्रारींच्या संख्येत देखील घट झाल्याचा प्रशासनाचा दावा आहे. पिंपरी-चिंचवडसह मावळ भागातील विविध गावांचा पाण्याचा पवना धरण मुख्य स्रोत आहे. पावसाने ओढ दिल्याने धरणातील पाणीसाठा १७ टक्क्यांवर आला होता. मागील चार दिवसांपासून पावसाने धरण पाणलोट क्षेत्रात दमदार हजेरी लावली. पिंपरी-चिंचवडसह मावळ भागातील विविध गावांचा पाण्याचा पवना धरण मुख्य स्रोत आहे.

# पोर्श अपघातानंतर ‘आरटीओ’ची दिखाऊ कारवाई!

## मोटार विनानोंदणी रस्त्यावर धावत असल्याचे समोर आले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कल्याणीनगर अपघात प्रकरणातील मोटार विनानोंदणी रस्त्यावर धावत असल्याचे समोर आले होते. यानंतर प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) कारवाईत शहरातील रस्त्यांवर विनानोंदणी धावणारी वाहने आढळली.**




ही वाहने विनानोंदणी थेट ग्राहकांच्या हाती देणाऱ्या वितरकांवर केवळ १० दिवस व्यवसाय परवाना निलंबनाची कारवाई आरटीओने केली आहे. त्यामुळे या कारवाईवर प्रश्न उपस्थित होत आहेत. आरटीओने २२ मे ते १ जून या कालावधीत तपासणी मोहीम हाती घेतली होती. या मोहिमेत ११ विनानोंदणी वाहने आढळली. त्यानंतर ग्राहकांच्या हाती विनानोंदणी वाहने देणाऱ्या ११ वितरकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. त्यात पुणे आरटीओच्या हद्दीतील ६, सातारा आरटीओ ३ आणि अकलूज व श्रीरामपूर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील प्रत्येकी एक अशा ११ वितरकांचा समावेश होता. पुण्याबाहेरील वितरकांबाबत संबंधित आरटीओंना कळविण्यात आले. या प्रकरणी पुण्यातील ६ वितरकांचा व्यवसाय परवाना ८ ते १७ जुलै या कालावधीत केवळ १० दिवसांसाठी निलंबित करण्यात आला.वितरकाने नोंदणी करूनच वाहन ग्राहकाच्या हवाली करावे, असा नियम आहे. या नियमाचे उल्लंघन करून वितरकांनी नोंदणी न करता वाहन थेट ग्राहकांना दिल्याचे निदर्शनास आले. अशा वितरकांवर कारवाईचे अधिकार आरटीओला आहेत. त्यांचे व्यवसाय प्रमाणपत्र ६ महिन्यांपर्यंत रद्द केले जाऊ शकते. पुण्यातील सहा वितरकांवर केवळ १० दिवसांची परवाना निलंबनाची कारवाई करण्यात आली.

### कारवाईबाबत मतभिन्नता

वितरकाला व्यवसाय परवाना निलंबनाच्या कालावधीत वाहन विक्रीसह इतर व्यवसाय करता येत नाहीत, असे आरटीओचे म्हणणे आहे. याच वेळी कारवाई झालेल्या वितरकांनी वेगळीच माहिती दिली. ‘निलंबनाच्या कालावधीत आम्ही नोंदणीसाठी पाठविलेल्या वाहनांची नोंदणी तेवढी आरटीओने केली नाही, आमचे इतर व्यवसाय सुरू होते,’ अशी माहिती वितरकांनी दिली.

## पिंपरी-चिंचवड: ताथवडे येथील

# एसटीपी, स्पाईन रस्ता, उड्डाणपूलासाठी 'ॲक्शन प्लॅन'!

### पिंपरी-चिंचवड महापालिकेने पशुसंवर्धन विभागाकडून जमीन ताब्यात घ्यावी : अजित पवार

। पिंपरी।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून शहरातील नागरी सुविधा निर्मितीचे योग्य नियोजन व्हावे यासाठी ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या जमिनीवर प्रस्तावित स्पाईन रस्ता, सांडपाणी प्रक्रिया केंद्र (एसटीपी) विकसित करण्यासह त्या जमिनीवर वाढीव नागरी सुविधा उभारण्यासाठीचा एकत्रित प्रस्ताव सादर करावा. त्या जमिनीचा मोबदला पशुसंवर्धन विभागास देऊन महानगरपालिकेने जमीन ताब्यात घ्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले.**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात आज ताथवडे (जि.पुणे) येथील पशुसंवर्धन विभागाच्या जमिनीवर बांधण्यात येणाऱ्या स्पाईन रस्ता आणि सांडपाणी प्रक्रिया केंद्राबाबतच्या कामांचा आढावा घेतला. या बैठकीस महसूल व पशुसंवर्धन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पशुधन विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शितलकुमार मुकणे उपस्थित होते. पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पशुसंवर्धन आयुक्त कौस्तुभ दिवेगावकर आदी मान्यवर दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार बैठकीत मार्गदर्शन करताना म्हणाले की, ताथवडे परिसरासह पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पुणे महानगर विकास प्राधिकरण क्षेत्रात लोकसंख्या वेगाने वाढत आहे. या क्षेत्रात विविध उद्योग घटकांसह नवीन आयटी कंपन्याही येत आहेत. या सर्वांचा विचार करता ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या जागेवर पिंपरी-चिंचवड महापालिकेमार्फत स्पाईन रस्ता आणि मलनिस्सारण प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येणार आहे. त्यामुळे शहराच्या विकास आराखड्यात ताथवडे येथील जागेचा समावेश करण्यात आला आहे. या जमिनीवर नागरी सुविधांची काही आरक्षणे टाकण्यात आली आहेत. पीएमआरडीए क्षेत्राचा विचार करता ताथवडे येथील मध्यवर्ती ठिकाणी मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध आहे. आवश्यक असणारी जागा महापालिकेला हस्तांतरित करण्यास पशुसंवर्धन विभाग सकारात्मक आहे. त्यामुळे महापालिकेला आवश्यक असणाऱ्या नागरी सुविधांसाठी लागणाऱ्या जमीन हस्तांतरणासंदर्भातील प्रस्ताव तातडीने पशुसंवर्धन विभागास सादर करावा. पशुसंवर्धन विभागामार्फत जमिनीचे मूल्यांकन करून मोबदला निश्चित करण्यात येईल. हा मोबदला भरून महापालिकेने जमीन लवकरात लवकर ताब्यात घ्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

#### जमीन हस्तांतर प्रक्रिया गतीने पार पाडावी

उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, ताथवडे परिसरासह पिंपरी चिंचवड येथील नागरिकांना वाहतूक कोंडीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका व्हावी यासाठी वाल्हेकरवाडी चौक ते औंध-रावेत रस्त्यावरील डेअरी फार्म चौक ताथवडे पर्यंतचा ४५ मीटर स्पाईन रस्ता प्रस्तावित करण्यात आला आहे. रस्त्याचे काम तातडीने सुरु करणे आवश्यक असल्याने जमीन हस्तांतर प्रक्रिया गतीने पार पाडावी. त्याचप्रमाणे येथील जमिनीवर २० एमएलडी क्षमतेचा मैलाशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात येणार आहे. भविष्यात जास्त क्षमतेचा प्रकल्प उभारावयाचा असल्यास मध्यवर्ती ठिकाणी जमीन मिळण्यात अडचणी येतील. त्यामुळे प्रकल्पाच्या भविष्यातील क्षमतावाढीच्यादृष्टीने अधिकची जमीन संपादित करून घ्यावी. या ठिकाणी स्पाईन रस्ता, उड्डाणपूल, एसटीपी आणि इतर विकास कामांसाठी १३ एकर जागेचा प्रस्ताव आहे. आवश्यकतेनुसार आत्ताच या क्षेत्रफळात वाढ करून नवीन प्रस्ताव पाठवावा. महानगरपालिकेने या जागेच्या वापराचा सविस्तर आराखडा तयार करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केल्या.

---

## पिंपरी-चिंचवडमध्ये अपघाताच सत्र थांबता थांबेना!

### निगडित चारचाकीने दोघांना दिली धडक



। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

चिंचवड शहरामध्ये अपघाताच सत्र थांबायचं नाव घेत नाही. निगडी येथे चारचाकीने दोन तरुणांना धडक दिल्याची घटना रात्री दहाच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी निगडी पोलिसांनी वाहन चालक सुहास वसंत जोशी यांच्यावर गुन्हा दाखल केला असून अपघातग्रस्त वाहन ताब्यात घेतल आहे. या घटनेचा एक सीसीटीव्ही सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. संकेत सुनील सातपुते याने निगडी पोलिसात तक्रार दिली आहे. संकेतसह मेघज संजय पाटील हा देखील जखमी आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निगडी येथील गुडलक चौकात रात्री सव्वा दहाच्या सुमारास संकेत आणि मेघज हे दोघे मेसवर जेवण करून त्यांच्या रूम कडे जात होते. तेव्हा गुडलक चौकातील रस्त्यावर त्यांना भरधाव चारचाकी गाडी क्रमांक एमएच-१२ आर.के ९२९१ या गाडीने त्यांना पाठीमागून धडक दिली. अपघातात संकेत आणि मेघज दोघे जखमी झाले आहेत. या दोघांना वाहन चालक याने तातडीने रुग्णालयात घेऊन गेले असल्याची माहिती निगडी पोलिसांनी दिली आहे.

---

## पिंपरी-चिंचवडमध्ये लातुरकरांचा स्नेहमेळावा

### आ. महेश लांडगे, आमदार अभिमन्यु पवार यांचा पुढाकार

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यातून पुणे, पिंपरी-चिंचवड, चाकण आणि पंचक्रोशीमध्ये नोकरी, व्यवसायानिमित्त स्थायिक झालेले लातूरकर स्नेहमेळाव्यानिमित्ताने एकत्र येणार आहेत. या कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी भाजपा आमदार महेश लांडगे आणि मार्गदर्शक म्हणून अभिमन्यू पवार उपस्थित राहणार आहेत.**

पुणे, पिंपरी-चिंचवड, चाकण, रांजनगाव, तळेगाव आणि भोसरी एमआयडसी क्षेत्रात तसेच आयटी व सेवा क्षेत्रात मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात नागरिक शहरात वास्तव्यास आहेत. गावापासून दूर असलेल्या या लातुरकरांना आपुलकीने एकत्र येता यावे. या करिता "लातुरकरांचा स्नेहमेळावा" आयोजित केला आहे. भोसरी येथील कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह येथे गुरूवार, दि. २५ जुलै रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ असा दिवसभर हा स्नेहमेळावा होणार आहे. लातूर जिल्ह्यातील लातूर, अहमदपूर, औसा, उदगीर, चाकूर, जळकोट, निलंगा, देवणी, शिरुअनंतपाळ, रेणापूर आदी भागातील सुमारे २५ हजार नागरिक पुणे आणि सभोवतालच्या परिसरात वास्तव्यास आहेत.

#### शहर अन् परिसरातील हजारो लातुरकरांच्या जिव्हाळ्याचा कार्यक्रम




#### .... असा आहे स्नेहमेळावा

"लातूरकरांचा स्नेहमेळावा" दणक्यात साजरा होणार आहे. या निमित्ताने भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप, आमदार अश्विनी जगताप, आमदार उमा खापरे यांच्यासह शहरातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी आमदार महेश लांडगे आणि मार्गदर्शक म्हणून आमदार अभिमन्यू पवार उपस्थित राहणार आहेत. यावेळी लातुरकरांच्या काही समस्या ऐकूण घेण्यात येणार आहेत. सकाळी १० वाजता कार्यक्रम सुरू होणार असून, दुपारी स्नेहभोजन आणि त्यानंतर विविध कार्यक्रमांचे नियोजन केले आहे.




# लोकसेवक की स्वयंसेवक?

**शासकीय सेवकांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमात सहभागी होण्यावर असलेली बंदी उठवण्याचा केंद्र सरकारचा निर्णय अनेक प्रश्न उपस्थित करणारा आहेच; शिवाय संघ व भाजपमध्ये सध्या सुरू असलेल्या कथित ताणतणावाला नवे वळण देणारा आहे. मुळात ही बंदी घातली गेली १९६६ ला. म्हणजे ५८ वर्षांपूर्वी. त्यानंतर १९७० व ८०ला ती कायम ठेवण्याचा निर्णय झाला.**

पार्श्वभूमी होती ती महात्मा गांधींच्या हत्येची. यात सहभाग असल्याच्या संशयावरून १९४८ मध्ये सरदार पटेलांनी संघावरच बंदी घातली. ती नंतर मागे घेण्यात आली, पण घटनेतील धर्मनिरपेक्षतेच्या चौकटीला छेद देणारा सरकारी बाबूंचा या संघटनेतील सहभाग योग्य कसा, या प्रश्नावर चर्चा होत राहिली व त्यातून हा निर्णय घेण्यात आला.



मधल्या काळात संघाचे अपत्य असलेल्या जनसंघ व भाजपचा सहभाग असलेली सरकारे आली पण कुणीही या बंदीकडे लक्ष दिले नाही. मग आताच ती उठवण्याचे कारण काय? गेल्या दहा वर्षांपासून मित्रपक्षांच्या सहकार्याशिवाय चालणारे व पूर्णपणे भाजपचे वर्चस्व असलेले सरकार देशात होते. तेव्हा ती का मागे घेण्यात आली नाही? अपेक्षेप्रमाणे या निर्णयाचे संघाने स्वागत व काँग्रेसने टीका केली असली, तरी ९ जुलैच्या या निर्णयावर आधी टीका झाल्यावर नंतर स्वागत करण्याची संघाची भूमिका नेमके काय दर्शवते? नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या काळात आता भाजपला संघाची गरज नाही असे विधान जे. पी. नड्डांनी केले होते. त्याचा थेट प्रतिवाद न करता निकालाची वाट बघणाऱ्या संघाने तो अपेक्षेप्रमाणे नाही हे दिसल्यावर एकूणच राजकीय नेतृत्वाच्या अहंकारावर तीव्र शब्दात भूमिका मांडली होती. यातून संघ व भाजपमध्ये सारे काही सुरळीत नाही अशी चर्चा सुरू झाली. यानंतरच हा निर्णय आल्याने भाजपने नाराज संघाला चुचकारण्यासाठी हे पाऊल उचलले का असा प्रश्न चर्चिला जाऊ लागला आहे.मुख्य म्हणजे ही बंदी उठवावी अशी मागणी संघाने गेल्या दहा वर्षांत कधीच केल्याचे दिसले नाही. मध्यंतरी मध्य प्रदेशातील शिवराजसिंह चव्हाण सरकारने राज्यातील कर्मचाऱ्यांसाठी असलेली बंदी उठवली होती. त्यावरूनही बरेच वादळ उठले; नंतर हा मुद्दा पुन्हा थंडबस्त्यात गेला. तो राष्ट्रीय पातळीवर पुन्हा उकरून काढण्यामागे भाजपकडून सुरू असलेल्या नव्या 'नॅरेटिव्ह'चा शोध हे तर कारण नसेल ना अशी शंका आता घेतली जाते. लोकसभेच्या वेळी मोदींची जादू, मंदिर, हिंदुत्व हे मुद्दे फारसे प्रभावी ठरले नाहीत. शिवाय ऐन निवडणुकीच्या काळात प्रचारात संघ सक्रियपणे सहभागी नव्हता अशीही चर्चा झाली. त्यावर तोडगा म्हणून हिंदुत्वाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आणताना संघालासुद्धा खूश करायचे हा हेतू या निर्णयामागे आहे का? संघ आजही स्वत:ला सांस्कृतिक संघटना म्हणवून घेतो. संघपरिवाराचा रचनात्मक व सेवाकार्याचा व्याप मोठा व वाखाणण्याजोगा आहे याविषयी कुणाचे दुमत असण्याचे काही कारण नाही. त्यामुळे बंदी असतानासुद्धा उजव्या विचाराचे अनेक शासकीय सेवक संघाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध ठेवून होतेच. त्यावर विरोधकांनीसुद्धा कधी फार आक्षेप घेतल्याचे दिसले नाही. एकूणच सारे सुरळीत असताना अचानक हा मुद्दा समोर आणण्याचे औचित्य काय असा प्रश्न उपस्थित होतो व त्याचे उत्तर मुद्द्यांच्या शोधात व संघापासून दूर जाण्याच्या वल्गना फसल्याने चिंतेत असलेल्या भाजपच्या कार्यशैलीत आढळते. उघडपणे हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या संघात जर आता उजळमाथ्याने शासकीय सेवकांना वावरता येत असेल तर इतर धर्माच्या संघटनांचे काय? त्यात सहभागी होण्याची मुभा कर्मचाऱ्यांना मिळणार का? मुस्लीम, शीख, जैन समाजांच्या उत्थानासाठी काम करणाऱ्या अनेक संघटना आहेत. त्यात सरकारी सेवकांना सक्रियपणे वावरता येईल का? तसे कुणी केलेच तर त्यावर विद्यमान सरकार व संघ परिवाराची भूमिका काय असेल? असा काही वाद भविष्यात उभा ठाकला तर सरकारची भूमिका समन्यायी असेल का? अशा संघटनांकडून होणारे धर्मजागरणाचे सोहळे सांस्कृतिक दृष्टिकोनातून बघितले जातील का? असे अनेक प्रश्न या निर्णयामुळे उपस्थित होणार आहेत.

## प्रासंगिक »

### 'कमला' पसंत?

***नारी सन्मान, स्थलांतरितांचे हक्क आदींवर प्रवचने झोडणाऱ्या डेमोक्रॅटिक पक्षास हे तत्त्वज्ञान प्रत्यक्षात आणण्याची सुसंधी हॅरिस यांच्या उमेदवारीने मिळेल...***

कोणत्याही यशाचा लाभांश हा अनंत काळ मिळवता येत नाही. अर्थशास्त्रातील 'लॉ ऑफ डिमिनिशिंग रिटर्न्स' हा सिद्धान्त जगण्याच्या सर्वच क्षेत्रांस लागू होतो आणि त्यास राजकारण अपवाद नाही. हे शहाणपण अखेर अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांस लक्षात येऊन त्यांनी अध्यक्षीय निवडणुकीतून माघार घेतली; हे उत्तम झाले. नपेक्षा नागरिकांनी मतदानातून बायडेन यांचा 'अहं' वाढल्याचा संदेश दिला असता आणि बायडेन हे स्वत:बरोबर पक्षाच्याही नामुष्कीस कारणीभूत ठरले असते. आपल्या यशास आता ओहोटी लागलेली आहे याचे भान नेतृत्व करणाऱ्यांस असावे लागते. ते तसे नसेल तर पक्षाच्या धुरीणांनी तरी अशा आत्मसुखी रममाण नेतृत्वास 'आता आटपा' असा संदेश द्यावा लागतो. हे दोन्ही घडले नाही तर हा निरोप मतदार देतातच देतात हा जगभरातील लोकशाहीचा इतिहास आहे.

केवळ पर्यटकांची संख्या वा त्यांच्या माध्यमातून महसुलात पडणारी भर वाढविणे यापलीकडे जाऊन राज्याला पर्यटनातील उदयोन्मुख राज्याच्या श्रेणीतून अग्रेसर राज्याच्या श्रेणीत आणणे, हे 'महाराष्ट्र पर्यटन धोरण २०२४'चे प्रमुख उद्दिष्ट आहे...

# राज्यात पर्यटन प्रोत्साहनासाठी नवे धोरण!

जागतिक पातळीवर भारताची वेगळी ओळख निर्माण करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील एनडीए सरकार करत आहे. पर्यटनाला चालना देणारी ध्येय धोरणे तयार करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार कटिबद्ध असून राज्याच्या पर्यटन विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात येत आहेत. केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या विश्लेषणानुसार, महाराष्ट्राचा समावेश 'उदयोन्मुख पर्यटन राज्य' या श्रेणीत करण्यात आला आहे. राज्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी आणि महाराष्ट्राला 'अग्रेसर राज्य' म्हणून प्रोत्साहन देण्यासाठी अतिरिक्त वित्तीय आणि बिगर वित्तीय प्रोत्साहनांसह पर्यटन धोरण – २०२४ तयार करण्यात आले आहे. पर्यटनाद्वारे राज्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करणे हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी राज्यात



उच्चतम दर्जाचे शाश्वत व जबाबदार पर्यटन विकसित करून ग्रामीण भागांतील पर्यटन व कृषी पर्यटनास वाव देण्याच्या दृष्टीने विविध पर्यटन पुरस्कार देण्याचा समावेश या धोरणात आहे.पर्यटन धोरणाद्वारे राज्यात अंदाजे एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक, १८ लक्ष रोजगारनिर्मिती, दहा वर्षांमध्ये पर्यटनस्थळी पायाभूत सुविधा विकसित करून आणि पर्यटन संस्था, एमआयसीई ऑपरेटर्स आणि डेस्टिनेशन वेडिंग ऑपरेटर्सना प्रोत्साहन देऊन पर्यटकांचा ओघ दुप्पट करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. लघु, मध्यम, मोठ्या, मेगा, अल्ट्रा मेगा पर्यटन प्रकल्पांना अ, ब, क या गटांमध्ये विभागण्यात आहे. त्यांना गुंतवणूक व रोजगारनिर्मितीच्या आधारे प्रोत्साहन देण्यात येणार आहे. पर्यटन घटकांना व्याज परतावा, एसजीएसटी परतावा, विद्युत शुल्कासह विविध करांमध्ये सवलती देण्यात येणार आहेत. होम स्टे, ॲग्रो टुरिझम या स्पर्धा विभागनिहाय घेण्यात येणार आहेत.देशातील व राज्यातील पर्यटकांना आकर्षित करणे, पर्यायाने व्यापार, उत्पन्न आणि उद्योजकतेला चालना देणे, ग्रामीण व शहरी भागांतील क्रयशक्तीला वाव देऊन रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून देणे, पर्यटन क्षेत्रात अतिरिक्त रोजगाराच्या संधी निर्माण करणे, पर्यटनाच्या माध्यमातून दुर्गम भागांचा विकास व त्यांना मुख्य प्रवाहात आणणे, पर्यटन क्षेत्रात नवी गुंतवणूक निर्माण करणे, राज्याच्या महसुलात वाढ करणे इत्यादी उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी हे धोरण तयार करण्यात आले आहे. राज्यातील वैविध्यपूर्ण, बहुप्रांतीय, बहुभाषिक संस्कृतीमुळे अनेक कार्यक्रम आणि उत्सवांचाही पर्यटनाच्या प्रचालनासाठी उपयोग करून घेता येणे शक्य आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# स्वत:च्या अहंकारामुळे संघटनेला ग्रहण

## सदाभाऊ खोत यांची राजू शेट्टी यांच्यावर टीका

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**स्वाभिमानी शेतकरी संघटनेमधून रविकांत तुपकर यांची हकालपट्टी करण्यात आली आहे. पक्षाच्या शिस्त पालन समितीचे अध्यक्ष जालिंदर पाटील यांनी सोमवारी पुण्यात ही घोषणा केली. यामुळे आता रविकांत तुपकर आणि राजू शेट्टी यांच्या वाटा वेगळ्या झाल्या आहेत. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या युवा आघाडीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी दीर्घकाळ सांभाळलेले रविकांत तुपकर यांना संघटनेतून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आल्यामुळे राजू शेट्टी यांच्यावर टीका होत आहे.**



रविकांत तुपकर यांची स्वाभिमानी शेतकरी संघटनेमधून हकालपट्टी करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर बोलताना रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष आणि माजी मंत्री सदाभाऊ खोत यांनी राजू शेट्टी यांच्यावर हल्लाबोल केला आहे. राजू शेट्टींच्या अहंकारामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेला ग्रहण लागल्याची खोचक टीका सदाभाऊ खोत यांनी केली आहे.शेतकरी चळवळ टिकली पाहिजे. हे शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाचं आहे. मात्र, स्वतःच्या अहंकारामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेला ग्रहण लागलं आहे. याचं आत्मपरीक्षण खऱ्या अर्थाने राजू शेट्टी यांनी करायला पाहिजे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेमध्ये उल्हासदादा पाटील असतील, मी स्वत: असेल किंवा शिवाजीराव माने, रविकांत तुपकर असतील. अशी मोठी यादी आपल्याला पाहायला मिळेल. हे सर्व कार्यकर्ते घरची भाकर खाऊन घरादारांवर तुळशीपत्र ठेऊन घराच्या बाहेर १० ते १५ वर्ष काम करत राहिले. तरीही अशा माणसांना अपमानित करणं योग्य नाही. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाने अजूनही विचार करावा आणि शेतकऱ्यांसाठीची ही चळवळ एकत्र कशी राहील, यासाठी प्रयत्न करावा", असं सदाभाऊ खोत यांनी म्हटलं आहे. ते माध्यमांशी बोलत होते.स्वाभिमानी शेतकरी संघटनेमधून रविकांत तुपकर यांची हकालपट्टी करण्यात आल्यानंतर आता रविकांत तुपकर यांनी त्यांची पुढची भूमिका काय असेल? याबाबत राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चा सुरु आहेत. मात्र, राज्यात नवीन राजकीय आघाडी तयार करण्यासाठी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी मोर्चेबांधणी सुरू केली असल्याचं बोललं जात आहे. याच दृष्टीने तुपकर यांची येत्या २४ जुलै रोजी पुणे येथे महत्त्वाची राज्यस्तरीय बैठक होत आहे. या बैठकीत विधानसभा निवडणुकांवर चर्चा होणार असून महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर होण्याची दाट शक्यता आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने समविचारी राजकीय पक्ष, संघटना यांची मोट बांधून तिसरी आघाडी तयार करण्याचे प्रयत्न तुपकर यांनी चालविले

### तिसरी आघाडी तयार करण्याचे प्रयत्न

शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी मोर्चेबांधणी सुरू केली असल्याचं बोललं जात आहे. याच दृष्टीने तुपकर यांची येत्या २४ जुलै रोजी पुणे येथे महत्त्वाची राज्यस्तरीय बैठक होत आहे. या बैठकीत विधानसभा निवडणुकांवर चर्चा होणार असून महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर होण्याची दाट शक्यता आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने समविचारी राजकीय पक्ष, संघटना यांची मोट बांधून तिसरी आघाडी तयार करण्याचे प्रयत्न तुपकर यांनी चालविले आहे.

आहे.रविकांत तुपकर यांची स्वाभिमानी शेतकरी संघटनेमधून हकालपट्टी करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर बोलताना रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष आणि माजी मंत्री सदाभाऊ खोत यांनी राजू शेट्टी यांच्यावर हल्लाबोल केला आहे. राजू शेट्टींच्या अहंकारामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेला ग्रहण लागल्याची खोचक टीका सदाभाऊ खोत यांनी केली आहे.शेतकरी चळवळ टिकली पाहिजे. हे शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाचं आहे. मात्र, स्वतःच्या अहंकारामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेला ग्रहण लागलं आहे. याचं आत्मपरीक्षण खऱ्या अर्थाने राजू शेट्टी यांनी करायला पाहिजे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेमध्ये उल्हासदादा पाटील असतील, मी स्वत: असेल किंवा शिवाजीराव माने, रविकांत तुपकर असतील. अशी मोठी यादी आपल्याला पाहायला मिळेल. हे सर्व कार्यकर्ते घरची भाकर खाऊन घरादारांवर तुळशीपत्र ठेऊन घराच्या बाहेर १० ते १५ वर्ष काम करत राहिले. तरीही अशा माणसांना अपमानित करणं योग्य नाही. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाने अजूनही विचार करावा आणि शेतकऱ्यांसाठीची ही चळवळ एकत्र कशी राहील, असं सदाभाऊ खोत यांनी म्हटलं आहे. ते माध्यमांशी बोलत होते.स्वाभिमानी शेतकरी संघटनेमधून रविकांत तुपकर यांची हकालपट्टी करण्यात आल्यानंतर आता रविकांत तुपकर यांनी त्यांची पुढची भूमिका काय असेल.

# महाबळेश्वर येथे पावसाने ओलांडली शंभरी

## दाट धुके आणि वर्षा पर्यटनाची पर्यटकांना भुरळ

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**महाबळेश्वर, पाचगणी, वाई,कास जावळीत पावसाची संततधार सुरु आहे.महाबळेश्वर येथील पावसाने या हंगामातील १०० इंचाचा टप्पा आज पार करत १०६ .५९४ इंच पावसाची नोंद झाली. धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस होत असल्याने धरणांच्या पाणी पातळीत वाढ होण्यास मदत होत आहे. अनेक ठिकाणी पावसाची उघडझाप मात्र सुरू आहे.**



महाबळेश्वरची जीवनवाहिनी असलेला वेण्णा लेक भरून वहात आहे.महाबळेश्वरचे आकर्षण लिंगमळा धबधबा आणि येथील पावसाळी वातावरण,दाट धुके निसर्गाने पर्यटकांना भुरळ पडली आहे.महाराष्ट्राचे नंदनवन व पावसाचे माहेरघर अशी ओळख असलेल्या महाबळेश्वर तालुक्यात पावसाची संततधार सुरू आहे. मागील महिन्याभरापासून बरसणाऱ्या पावसाने महाबळेश्वर येथे शंभर इंच पाऊस झाला. १ जूनपासून कमी अधिक पाऊस पाऊस आहे. महाबळेश्वर येथे आज १४७ (एकूण २७०७) मिमी १०६.५९४ इंच पावसाची नोंद झाली.यावर्षी या हंगामातील एक महिण्यात (दि ३० जून पावसाने ५०.८०७ इंचाचा (१२९०.५० मिमी)टप्पा आज पार केला होता सातारा तालुक्यातील व जावळी, वाईचा पश्चिम भाग,कास पठार परिसरातील नद्या, नाले, ओढे ओसंडून वाहू लागले आहेत. या पावसामुळे महाबळेश्वरची जीवनवाहिनी असलेला वेण्णालेक तलाव पूर्णपणे भरल्याने पावसाळी हंगामात पर्यटक बोटींगचा आनंद घेऊ लागले आहे.

### केटस् पॉईंट ठिकाणी पर्यटकांची गर्दी

शहरातील संततधार पावसामुळे शेतीच्या कामांनी वेग आला आहे. तर वर्षा पर्यटनासाठी पर्यटनाची देखील वीकएंडला रेलचेल वाढली आहे. पर्यटक हे दाट धुकं, रिमझिम पाऊस व थंडीमध्ये देखील पर्यटनाचा आनंद लुटताना दिसत आहेत.वर्षा पर्यटनासाठी प्रसिद्ध लिंगमळा, केटस् पॉईंट अशा ठिकाणी पर्यटकांची गर्दी होत आहे. सातारा जिल्ह्यात दि.२२ जुलै रोजी सरासरी २६.७ मि.मी. पावसाची नोंद झाली असून 1 जून पासून आतापर्यंत एकूण सरासरी ५१०.१ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. तालुका निहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे.

# नीट-यूजी फेरपरीक्षा होणार नाही!

## सबळ पुरावा न आढळल्यामुळे फेरपरीक्षा घेण्याची मागणी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणानंतर ही परीक्षा पुन्हा घेण्यात यावी, अशी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी घेत असताना फेरपरीक्षा घेण्याची मागणी फेटाळून लावत पेपरफुटी प्रकरण हे पूर्वनियोजित असल्याचा एकही पुरावा मिळाला नसल्याचेही न्यायालयाने सांगितल. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील तीन न्यायाधीशाच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.**



### मिश्रा यांच्या खंडपीठासमोर सुनावणी

या सुनावणीपूर्वी, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत ‘नीट-यूजी’चे ‘नॅशनल टेस्टिंग एजन्सी’ने शहरनिहाय आणि केंद्रनिहाय निकाल शनिवारी आपल्या संकेतस्थळांवर जाहीर केले. त्यातील तपशिलांनुसार, भरघोस गुण मिळाल्यानंतर फेरपरीक्षा द्यावी लागलेल्या विद्यार्थ्यांची कामगिरी तितकीशी चांगली नसल्याचे आढळले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर अपलोड केलेल्या सूचीनुसार, सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. जे बी पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी होईल. ‘नीट-यूजी’ २०२४ प्रवेश परीक्षा रद्द करा, फेरपरीक्षा घ्या अशा मागण्या या याचिकांमध्ये करण्यात आल्या आहेत.

सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी निकाल देताना सांगितले, नॅशनल टेस्टिंग एजन्सी आणि आयआयटी मद्रासने दिलेला अहवाल तपासल्यानंतर लक्षात येते की, पेपरफुटी प्रकरणाची व्याप्ती फार मोठी नाही किंवा हे प्रकरण फार व्यापक नाही. “सध्या आपल्याकडे असलेल्या पुराव्याच्या आधारे पेपरफुटी प्रकरण हे सुनियोजित पद्धतीने राबवविले गेले, हे सिद्ध होत नाही. त्यामुळे परीक्षेचे पावित्र्य भंग झाले, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही”, असेही सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड म्हणाले.तसेच हजारीबाग आणि पाटणा येथे पेपरफुटी झाली याबाबतही आम्हाला बिलकुल संशय नाही. त्याठिकाणी पेपरफुटी झाली आहे, असेही खंडपीठाने सांगितले. सीबीआयच्या अहवालानुसार या दोन परीक्षा केंद्रावरील १५५ विद्यार्थ्यांच्या पलीकडे आणखी काही लाभार्थी असण्याची शक्यता कमीच आहे, असेही न्यायालयाने सांगितले. देशभरात ५ मे रोजी ‘नीट-यूजी’ची प्रवेश परीक्षा झाली होती, त्यामध्ये प्रश्नपत्रिका फुटणे, परीक्षार्थींना गुण वाढवून देणे आणि तोतयागिरी यासह गैरप्रकार झाल्याचे आरोप करणाऱ्या ४०पेक्षा जास्त याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. त्या सर्व याचिकांवर आज एकत्रित सुनावणी होईल.या सुनावणीपूर्वी, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत ‘नीट-यूजी’चे ‘नॅशनल टेस्टिंग एजन्सी’ने शहरनिहाय आणि केंद्रनिहाय निकाल शनिवारी आपल्या संकेतस्थळांवर जाहीर केले. त्यातील तपशिलांनुसार, भरघोस गुण मिळाल्यानंतर फेरपरीक्षा द्यावी लागलेल्या विद्यार्थ्यांची कामगिरी तितकीशी चांगली नसल्याचे आढळले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर अपलोड केलेल्या सूचीनुसार, सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. जे बी पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी होईल. ‘नीट-यूजी’ २०२४ प्रवेश परीक्षा रद्द करा, फेरपरीक्षा घ्या अशा मागण्या या याचिकांमध्ये करण्यात आल्या आहेत.सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी निकाल देताना सांगितले, नॅशनल टेस्टिंग एजन्सी आणि आयआयटी मद्रासने दिलेला अहवाल तपासल्यानंतर लक्षात येते की, पेपरफुटी प्रकरणाची व्याप्ती फार मोठी नाही किंवा हे प्रकरण फार व्यापक नाही. “सध्या आपल्याकडे असलेल्या पुराव्याच्या आधारे पेपरफुटी प्रकरण हे सुनियोजित पद्धतीने राबवविले गेले, हे सिद्ध होत नाही. त्यामुळे परीक्षेचे पावित्र्य भंग झाले, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही”, असेही सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड म्हणाले.तसेच हजारीबाग आणि पाटणा येथे पेपरफुटी झाली याबाबतही आम्हाला बिलकुल संशय नाही. त्याठिकाणी पेपरफुटी झाली आहे, असेही खंडपीठाने सांगितले. सीबीआयच्या अहवालानुसार या दोन परीक्षा केंद्रावरील १५५ विद्यार्थ्यांच्या पलीकडे आणखी काही लाभार्थी असण्याची शक्यता कमीच आहे, असेही न्यायालयाने सांगितले. देशभरात ५ मे रोजी ‘नीट-यूजी’ची प्रवेश परीक्षा झाली होती, त्यामध्ये प्रश्नपत्रिका फुटणे, परीक्षार्थींना गुण वाढवून देणे आणि तोतयागिरी यासह गैरप्रकार झाल्याचे आरोप करणाऱ्या ४०पेक्षा जास्त याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. त्या सर्व याचिकांवर आज एकत्रित सुनावणी होईल.

# खालिस्तानी समर्थकांकडून मंदिराची विटंबना

## खालिस्तानी समर्थकांकडून मंदिरांना लक्ष्य करण्याची पहिलीच वेळ

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज


**दिवसांपासून कॅनडात खालिस्तानी समर्थकांकडून सातत्याने मंदिरांना लक्ष्य करण्यात येत आहे. सोमवारी एडमंटनमध्ये पुन्हा एका मंदिराची तोडफोड करत विटंबना करण्यात आली आहे. तसेच मंदिराच्या भिंतीवर भित्तिचित्रे काढत विद्रुप करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या घटनेनंतर कॅनडातील हिंदू धर्मियांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.**




### कॅनडातील हिंदू धर्मियांनी तीव्र नाराजी

या मंदिराच्या भींतींवर भारतविरोधात घोषणा लिहिण्यात आल्या होत्या. ज्यामुळे भारतीय समुदायामध्ये संताप निर्माण झाला होता. तसेच सप्टेंबरमध्ये, BAPS स्वामीनारायण मंदिर, टोरंटोची कॅनडियन खलिस्तानी अतिरेक्यांनी विटंबना केली होती. दिवसांपासून कॅनडात खालिस्तानी समर्थकांकडून सातत्याने मंदिरांना लक्ष्य करण्यात येत आहे. सोमवारी एडमंटनमध्ये पुन्हा एका मंदिराची तोडफोड करत विटंबना करण्यात आली आहे. तसेच मंदिराच्या भिंतीवर भित्तिचित्रे काढत विद्रुप करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या घटनेनंतर कॅनडातील हिंदू धर्मियांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

कॅनडातील विश्वहिंदू परिषदेने एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात माहिती दिली आहे. कॅनडाच्या एडमंटनमधील स्वामीनारायण मंदिरात खालिस्तानी समर्थकांकडून तोडफोड करण्यात आल्याचं त्यांनी सांगितले आहे. तसेच या घटनेचा निषेध करत कॅनडा सरकारकडे दोषींवर कारवाई करण्याची मागणीही विश्व हिंदू परिषदेकडून करण्यात आली आहे.महत्त्वाचे म्हणजे खालिस्तानी समर्थकांकडून मंदिरांना लक्ष्य करण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वीही त्यांनी अनेकदा कॅनडातील मंदिरांची तोडफोड केली आहे. गेल्यावर्षी मिसिसोंगा येथील राम मंदिराची तोडफोड करून त्यावर भारतविरोधी घोषणा लिहिल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर टोरंटो येथील भारताच्या वाणिज्य दूतावासाने या घटनेचा निषेध नोंदवला होता. तसेच दूतावासाने या प्रकरणातील गुन्हेगारांना कठोर शिक्षा देण्याची मागणी केली होती. याशिवाय जानेवारीमध्ये, ब्रॅम्प्टन येथील एका मंदिराची विटंबना करण्यात आली होती.



# सर्वसामान्य संकल्प!

भारतीय महिला आणि सामान्य लोकांचा जिव्हाळ्याचा विषय म्हणजे सोनं. सोन्याचे दर वाढतात की कमी होतात? याकडे नेहमीच भारतीय सामान्य माणूस लक्ष ठेवून असतो. आज केंद्रीय अर्थसंकल्प जाहीर झाल्यानंतर सोन्याचे दर घसरले. एनडीए सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातला अर्थसंकल्प आज सादर झाला. सोन्यावरील सीमाशुल्क (कस्टम ड्युटी) कमी करण्यात आले. सीमाशुल्क कमी करताच सोन्याच्या दरात घसरण पाहायला मिळाली. देशभरात विविध ठिकाणी वेगवेगळे दर असले तरी १० ग्रॅममागे चार हजार रुपयांनी सोने स्वस्त झाल्याचे कळते आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्पीय भाषणात सोने, चांदी आणि इतर मौल्यवान धातूवरील सीमाशुल्क घटविण्याचा निर्णय घेतला. "देशातील सोने आणि मौल्यवान धातूंच्या दागिन्यांमध्ये देशांतर्गत मूल्यवर्धन वाढवण्यासाठी मी सोने आणि चांदीवरील सीमाशुल्क ६ टक्के आणि प्लॅटिनमवरील ६.४ टक्के करण्याचा प्रस्ताव देते", असं अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या. मल्टी कमोडिटी एक्सचेंज अर्थात एमसीएक्स आज सकाळी सोन्याचा दर प्रति तोळा ७२,८३८ रुपये होता. अर्थसंकल्पात सीमाशुल्क ६ टक्क्यांवर आल्याचे कळताच बाजारात सोन्याची विक्री वाढली. एमसीएक्सवर सोन्याच्या विक्रीचा प्रति तोळा दर आता ६८,५०० रुपयांपर्यंत पोहोचला आहे.महाराष्ट्रात जळगाव ही सुवर्ण नगरी मानली जाते. बाहेरच्या राज्यातूनही लोक याठिकाणी सोने विकत घेण्यासाठी येत असतात. जळगावमध्ये अर्थसंकल्प जाहीर होताच. सोन्याच्या दरात प्रतितोळा ३ हजार रुपयांची घट झाली. यामुळे आता ग्राहकांकडून आनंद व्यक्त करण्यात येत आहे. जळगावमधील सराफा व्यावसायिकांनी एबीपी माझा वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले की, सकाळी सोन्याचा दर ७३ हजार रुपये होता. मात्र अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर दोन तासांत सोन्याचा दर ७१ हजारावर आला. जळगाव मधील सराफा बाजारात दोन ते तीन हजार रुपयांची तात्काळ घसरण पाहायला मिळाली असली तरी कालांतराने देशभरात घसरण ४ हजारापर्यंत असल्याचे कळले.

**600 कोटी**
विदर्भ मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प

**400 कोटी**
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते सुधार

**466 कोटी**
सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक कॉरिडॉर :

**598 कोटी**
पर्यावरणपूरक शाश्वत कृषि प्रकल्प :

**150 कोटी**
महाराष्ट्र कृषी आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्प :

**2.68 कोटी**
भारताकडून भूतानला सर्वाधिक २,०६८.५६ कोटी रुपयांची मदत मिळण्याचा अंदाज

## काय स्वस्त



- कॅन्सरच्या उपचाराच्या औषधांवरील कस्टम शुल्क कमी होणार
- मोबाइल फोन, संबंधित पार्ट, चार्जरवरील सीमा शुल्क घटणार
- एक्सरे ट्यूबवर सूट
- मोबाइल फोन, चार्जरवरील ड्यूटी 15 टक्क्यांनी कमी
- 25 महत्त्वाच्या खनिजांवर शुल्क नाही
- फिश फीडवरील शुल्क घटले
- लेदर, कपडे आणि शूट स्वस्त होणार
- सोनं, चांदीवरील सीमा शुल्क घटवून 6 टक्के
- प्लेटिनमवरील सीमा शुल्क घटवून 6.4 टक्क्यांपर्यंत

## सर्वात जास्त मदत कोणत्या देशाला मिळते?

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज एनडीए सरकारचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रासाठी मोठ्या घोषणा करण्यात आल्या. या अर्थसंकल्पामध्ये शेतकरी, संरक्षण विभाग, युवा, कृषी, शिक्षण क्षेत्रासह आदी महत्वाच्या क्षेत्रासाठी मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. दरम्यान, अर्थसंकल्प सादर करण्यात आल्यानंतर भारताकडून सगळ्यात जास्त कुठल्या देशाला मदत मिळते? याची माहितीही बजेटमधून समोर आली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, भारताने सर्वाधिक मदत भूतानला दिल्याचे दिसून येत आहे. २०२३-२४ च्या सुधारित अंदाजानुसार, भारताने परदेशी सरकारांना ६,५४१ कोटी रुपये दिले. २०२३-२४ मध्ये ही रक्कम ५,८४८ कोटी रुपये होती. दरम्यान, आता २०२४-२५ च्या अर्थसंकल्पानुसार, भारताकडून भूतानला सर्वाधिक २,०६८.५६ कोटी रुपयांची मदत



मिळण्याचा अंदाज आहे. हे गेल्या वर्षीच्या तुलनेत २,४०० कोटींपेक्षा कमी आहे. दरम्यान, भूताननंतर नेपाळला जास्तीत जास्त मदत दिली जाईल. माहितीनुसार, भारत आणि मालदीवला गेल्या वर्षी प्रमाणेच ४०० कोटी रुपये मिळणार आहेत. तसेच २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या सुधारित अर्थसंकल्पात ही रक्कम ७७०.९० कोटी रुपये होती. भूतान, नेपाळ आणि मालदीव व्यतिरिक्त भारत इतर अनेक देशांना मदत करेल. यामध्ये श्रीलंका, अफगाणिस्तान, बांगलादेश आणि लॅटिन अमेरिकन देशांचा समावेश आहे. यामध्ये कोणत्या देशाला किती मदत दिली जाईल, याविषयी सविस्तर माहिती जाणून घेऊयात केंद्रीय अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी वित्तीय तूट कमी करण्याचं लक्ष्य ठेवलं आहे. जीडीपीच्याच्या ४.९४. टक्के ठेवण्याचे लक्ष्य ठेवले आहे. दरम्यान, हे १ फेब्रुवारी रोजी अंतरिम बजेटमध्ये घोषित केलेल्या ५.१ टक्के लक्ष्यापेक्षा कमी आहे. आर्थिक वर्ष २०२३ -२४ साठी, प्रारंभिक वित्तीय तुटीचे लक्ष्य जीडीपीच्याच्या ५.९ टक्के होते. नंतर सुधारित करून ५.८ टक्के करण्यात आले....

## काय महाग



- प्लास्टिक सामानावरील आयात शुल्कात वाढ
- पेट्रोकेमिकल-अमोनियम नायट्रेटवरील सीमा शुल्क वाढवले
- पीवीसी-इंपोर्ट घटविण्यासाठी 10-25 टक्क्यात वाढ
- विमान प्रवास महाग
- सिगारेट पण महा



# टीम इंडिया सेमीफायनलमध्ये दाखल!

## कर्णधार कौरला या सामन्यात विश्रांती देण्याचा निर्णय

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**महिला टी-२० आशिया चषक स्पर्धेतील दहाव्या सामन्यात भारतीय संघाने नेपाळविरुद्ध ८२ धावांनी विजय मिळवत सेमीफायनलमध्ये धडक मारली. भारत सेमीफायनलमध्ये पोहोचणारा पहिला संघ ठरला आहे. या सामन्यात भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना शफाली वर्माच्या वादळी ८१ धावांच्या खेळीच्या जोरावर नेपाळला १७९ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात नेपाळचा संघ सतत विकेट गमावत राहिला आणि निर्धारित २० षटकात त्यांना केवळ ९६ धावा करता आल्या.**





### हेमलता 42 चेंडूत 47 धावा करून बाद

कर्णधार इंदूने १४ आणि सीताने १८ धावा केल्या. त्यामुळे नेपाळ संघ ५२ धावांत ४ विकेट गमावून अडचणीत सापडला होता. इथून विकेट पडण्याची अशी मालिका सुरू झाली की पुढच्या ४० धावांत संघाने उर्वरित ४ विकेट गमावल्या. नेपाळ संघाचे ७ फलंदाज दुहेरी आकडाही गाठू शकले नाहीत.या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेल्या भारतीय संघाने २० षटकांत ३ गडी गमावून १७८ धावा केल्या. शफाली वर्मा आणि दयालन हेमलता यांनी संघाला चांगली सुरुवात करून दिली होती. या दोघांमध्ये पहिल्या विकेटसाठी १२२ धावांची भागीदारी झाली. हेमलता ४२ चेंडूत ४७ धावा करून बाद झाली. त्याचवेळी शफालीने २६ चेंडूत चालू स्पर्धेतील तिचे दुसरे अर्धशतक झळकावले. यानंतर ४८ चेंडूत ८१ धावा करून ती बाद झाली. यादरम्यान तिने १२ चौकार आणि एक षटकार लगावला.

या पराभवासह नेपाळ अधिकृतपणे स्पर्धेतून बाहेर पडला आहे. महिला आशिया चषक २०२४ च्या गट टप्प्यात, टीम इंडियाने तिन्ही सामने जिंकून अ गटात अव्वल स्थान पटकावले. अशा प्रकारे भारताने आशिया कपच्या सेमीफायनलमध्ये सर्वात पहिल्यांदा स्थान निश्चित केले आहे.या सामन्यात भारताने दिलेल्या १७९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नेपाळ संघाने २१ धावांतच २ महत्त्वाच्या विकेट्स गमावल्या. यानंतर कर्णधार इंदू बर्मा आणि सीता मगर यांनी मिळून २२ धावांची भर घातली असली तरी दोन्ही सेट झालेले फलंदाज अवघ्या ६ चेंडूंत बाद झाले. कर्णधार इंदूने १४ आणि सीताने १८ धावा केल्या. त्यामुळे नेपाळ संघ ५२ धावांत ४ विकेट गमावून अडचणीत सापडला होता. इथून विकेट पडण्याची अशी मालिका सुरू झाली की पुढच्या ४० धावांत संघाने उर्वरित ४ विकेट गमावल्या. नेपाळ संघाचे ७ फलंदाज दुहेरी आकडाही गाठू शकले नाहीत. या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेल्या भारतीय संघाने २० षटकांत ३ गडी गमावून १७८ धावा केल्या. शफाली वर्मा आणि दयालन हेमलता यांनी संघाला चांगली सुरुवात करून दिली होती. या दोघांमध्ये पहिल्या विकेटसाठी १२२ धावांची भागीदारी झाली. हेमलता ४२ चेंडूत ४७ धावा करून बाद झाली. त्याचवेळी शफालीने २६ चेंडूत चालू स्पर्धेतील तिचे दुसरे अर्धशतक झळकावले. यानंतर ४८ चेंडूत ८१ धावा करून ती बाद झाली. यादरम्यान तिने १२ चौकार आणि एक षटकार लगावला. नेपाळविरुद्धच्या या सामन्यात स्मृती मानधनाने टीम इंडियाची धुरा सांभाळली. कारण संघाची नियमित कर्णधार हरमनप्रीत कौरला या सामन्यात विश्रांती देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. वास्तविक, हरमनप्रीत कौरला स्पर्धेतील वर्कलोड मॅनेज करण्यासाठी मोठ्या सामन्यांपूर्वी विश्रांती देण्यात आली. हरमनप्रीत कौर ग्रुप स्टेजच्या पहिल्या दोन सामन्यात संघाची धुरा सांभाळताना दिसली होती. तिच्याशिवाय, पूजा वस्त्राकर देखील प्लेइंग इलेव्हनचा भाग नव्हती. तिला पण विश्रांती देण्यात आली होती.या पराभवासह नेपाळ अधिकृतपणे स्पर्धेतून बाहेर पडला आहे. महिला आशिया चषक २०२४ च्या गट टप्प्यात, टीम इंडियाने तिन्ही सामने जिंकून अ गटात अव्वल स्थान पटकावले. अशा प्रकारे भारताने आशिया कपच्या सेमीफायनलमध्ये सर्वात पहिल्यांदा स्थान निश्चित केले आहे.या सामन्यात भारताने दिलेल्या १७९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नेपाळ संघाने २१ धावांतच २ महत्त्वाच्या विकेट्स गमावल्या. यानंतर कर्णधार इंदू बर्मा आणि सीता मगर यांनी मिळून २२ धावांची भर घातली असली तरी दोन्ही सेट झालेले फलंदाज अवघ्या ६ चेंडूंत बाद झाले.

# इंग्लंडमध्ये षटकार मारण्यावर बंदी!

## इंग्लंडमधील एका क्लबने षटकार मारण्यावर बंदी घातली आहे

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**क्रिकेटच्या खेळात चौकार आणि षटकार यांना विशेष महत्व आहे. त्यातल्या त्यात षटकार तर खेळाडू आणि चाहत्यांना खूपच प्रिय असतो. कारण खेळाडू झटपट धावा करण्यासाठी षटकार मारण्याला जास्त प्राधान्य देतात. ज्यामुळे त्यांचे चाहतेही खूश होऊन खेळाडूंना दाद देतात आणि संघालाही फायदा होतो. मात्र, इंग्लंडमधील एका जुन्या क्रिकेट क्लबने चक्क षटकार मारण्यावर बंदी घातली आहे. या क्लबमध्ये फलंदाजाने षटकार मारला, तर त्याला बाद घोषित केले जात आहे.**



### कोषाध्यक्ष काय म्हणाले?

जाईल. यापैकी पहिल्या षटकारानंतर ताकीद देण्याबरोबरच त्या संघाला षटकाराच्या ६ धावाही दिल्या जाणार नाहीत. साउथविक आणि शोरहॅम क्रिकेट क्लबचे कोषाध्यक्ष मार्क ब्रॉक्सअप यांनी या प्रकरणाची संपूर्ण माहिती दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार, विम्याचे दावे आणि कायदेशीर कारवाईमुळे होणारा खर्च टाळण्यासाठी हा नियम करण्यात आला आहे.या नियमाबाबत क्लबचे कोषाध्यक्ष मार्क ब्रॉक्सअप म्हणाले, 'जुन्या काळी क्रिकेट शांत वातावरणात खेळले जायचे. पण टी-२० आणि मर्यादित षटकांच्या क्रिकेटच्या आगमनानंतर या खेळात अधिक आक्रमकता दिसू लागली आहे. खरं तर, स्टेडियमजवळ राहणाऱ्या एका ८० वर्षीय व्यक्तीने सांगितले क्रिकेटच्या खेळात चौकार आणि षटकार यांना विशेष महत्व आहे. त्यातल्या त्यात षटकार तर खेळाडू आणि चाहत्यांना खूपच प्रिय असतो. कारण खेळाडू झटपट धावा करण्यासाठी षटकार मारण्याला जास्त प्राधान्य देतात. ज्यामुळे त्यांचे चाहतेही खूश होऊन खेळाडूंना दाद देतात आणि संघालाही फायदा होतो.

त्यामुळे आज आपण त्या क्रिकेट क्लबचे नाव आणि त्यांनी षटकार मारण्यावर बंदी का घातलीय? जाणून घेऊया. इंग्लंडमधील साउथविक आणि शोरहॅम क्रिकेट क्लबची षटकारांवर बंदी घालण्याची कल्पना अगदी विचित्र वाटू शकते. पण या मागचे कारण त्याहूनही रंजक आहे. त्याचे कारण जाणून घेतल्यावर प्रत्येकजण म्हणू शकतो की हा निर्णय क्लबसाठी सोपा नसेल. क्लबने हा निर्णय घेतला कारण मैदानाजवळ राहणाऱ्या लोकांनी त्यांच्या मालमत्तेचे नुकसान झाल्याची तक्रार दाखल केली होती. एवढेच नाही तर सामना पाहण्यासाठी येणाऱ्या लोकांना दुखापत आणि वाहनांच्या नुकसानाच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. या समस्येतून सुटका करण्यासाठी क्लबने हा नियम केला आहे.या नियमात अशी तरतूद आहे की जर फलंदाजाने षटकार मारला तर त्याला बाद घोषित केले जाईल. मात्र, यात एकच शिथिलता आहे की, पहिला षटकार मारल्यास फलंदाजाला ताकीद दिली जाईल. मात्र ताकीद दिल्यानंतरही षटकार मारल्यास त्याला बाद घोषित केले